जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 AUG 2019

तरुण भारत

# मोडी पत्रांनी तत्कालीन समाज जोडला

## प्रा.डॉ. देवानंद शिंदे : 'शंभर वर्षापूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे' पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मोडी पत्रांनी शंभर वर्षापूर्वी तत्कालीन समाजासह नाती जोडण्याचे काम केले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

ताराबाई रोड येथील महालक्ष्मी धर्मशाळा हॉल येथे उदयसिंह राजेयादव लिखित 'शंभर वर्षापूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे" या पुस्तकाचे गुरुवारी डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, पुस्तकामध्ये मोडी लिपीतील पोस्टकार्डच्या रूपाने अमूल्य ऐतिहासिक लिखित ठेवा जोपासला आहे. ही लिपी तत्कालीन जीवनशैलीचा एक भाग होती. तसेच पोस्टकार्डमुळे कमी शब्दात नेमकेपणाने मोडी लिपी ही संवाद साधण्याचे एक प्रभावी साधन होते. यामुळे जाणीवा निर्माण होऊन भावनांचा अर्थ लावता आला. पोस्टकार्ड मोडी पत्रांमुळे तत्कालीन जीवनशैलीचा उलगडा पुस्तकाच्या माध्यमातून झाला असून अमूल्य ठेवा जोपासला पाहिजे.



कोल्हापूर : 'शंभर वर्षापूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे", या पुस्तकाचे प्रकाशन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे. यावेळी प्रा. डॉ. रत्नाकर पंडित, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित.

उदयसिंह राजेयादव यांनी नव्या पिढीला मोडी लिपीची ओळख व्हावी, यासाठी पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. यामधून संस्कृतीचे दर्शन होऊन तत्कालीन इतिहासातील माहिती मिळणार आहे, असे सांगितले. सूत्रसंचालन मीरा उत्पात-ताशी व विजय जाधव यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. रत्नाकर पंडित, भारतीय डाक विभाग वरिष्ठ अधीक्षक ईश्वर पाटील, वारणा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांची उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 AUG 2019

महाराष्ट्र टाईम्स



उदयसिंह राजेयादव लिखित 'शंभर वर्षांपूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे' पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

# मोडी पत्रांमुळे समाजजीवनावर प्रकाश

**कोल्हापूर टाइम्स टीम**

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

काळासोबत चालताना इतिहास महत्वपूर्ण ठरतो. तत्कालीन व्यवस्थेमधील समाजजीवन समजून घेण्यासाठी मोडी भाषेतील 'शंभर वर्षांपूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे' हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. उदयसिंह राजेयादव लिखित 'शंभर वर्षांपूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे' पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते गुरुवारी बोलत होते. महालक्ष्मी धर्मशाळेच्या सभागृहात पुस्तक प्रकाशन कार्यक्रम पार पडला. प्रा. डॉ. रत्नाकर पंडित अध्यक्षस्थानी होते.

डॉ. शिंदे म्हणाले, 'एकेकाळी पोस्टकार्ड हे रोजच्या दैनंदिन जीवनाचा भाग होते. माणसाचा त्याच्याशी जिव्हाळ्याचा संबंध होता. काळाच्या ओघात पोस्टकार्ड व मोडी लिपी काहीशी मागे पडली तरी संवादाचे प्रभावी साधन म्हणून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तत्कालीन परिस्थितीत लिखित संवादाचे प्रभावी साधन म्हणून पोस्ट कार्डाकडे पाहिले जायचे. आमच्या पिढीला लेखनाचे धडे त्यातूनच मिळाले. त्यामुळे खऱ्या अर्थाने लेखनकलेचा विकास होत गेला. आमच्यातील जाणिवा निर्माण व्हायला, भावनांचा अर्थ कळायला तसेच नातेसंबंध दृढ व्हायला पोस्टकार्ड कारणीभूत आहे. काळ बदलला संवादाची साधने बदलली तरी पोस्ट कार्डाची सर त्यांना येणार नाही. पूर्वी पत्रे सांभाळून ठेवली जायची. त्या रूपांनी आठवणी संग्रहित राहायच्या. मोडी भाषेने तर इतिहासाचा अमूल्य ठेवा वर्षानुवर्षे जपून ठेवला आहे. मोडी भाषेतील एकएक पत्र हा अखंड संदर्भग्रंथ आहे. येणाऱ्या काळात हा अमूल्य ठेवा जतन करणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.' कार्यक्रमात पोलिस निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल ऐश्वर्या ऐताळ हिचा सत्कार करण्यात आला. डाक विभागाचे ईश्वर पाटील, प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. वसंत शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मीरा उत्पात- ताशी व विजय जाधव यांनी सूत्रसंचालन केले.